दिनांक :        .२.२०१९

प्रति,

मा. मुख्यमंत्री,

महाराष्ट्र राज्य

**विषय : पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात बेशिस्त बांधकाम करून मंदिराच्या पुरातन वास्तूला धोका निर्माण करणारे आणि शिर्डी येथील श्री साईबाबा संस्थानचा प्रसाद बनवण्यासाठी बनावट कंपनीला कंत्राट देणारे, यांच्यांवर कठोर कारवाई करण्याविषयी....**

महोदय,

महाराष्ट्र सरकारने आजपर्यंत ज्या ज्या मंदिरांचे सरकारीकरण केले, त्या सर्व मंदिरांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार आणि अनियमितताच समोर आली आहे. यातील अनेक प्रकरणांमध्ये न्यायालयात याचिकाही चालू आहेत. भ्रष्टाचार आणि अनियमितता यांची प्रत्येक मंदिरांमध्ये नवनवीन प्रकरणे उघडकीस येत आहेत. सरकारीकरण केलेल्या मंदिर व्यवस्थापनाचा गलथान आणि अनागोंदी कारभाराचे आणखी एक उदाहरण म्हणजे पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिण मंदिर आणि शिर्डी येथील श्री साईबाबा संस्थान ! नुकतेच पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या वास्तूला बेशिस्त बांधकामामुळे धोका निर्माण झाल्याचे आणि शिर्डी येथील श्री साईबाबा संस्थानने प्रसादाचा लाडू बनवण्याचे कंत्राट एका बनावट संस्थेला दिल्याची वृत्ते प्रसिद्ध झाली. या संदर्भात काही बाबी आपल्या निदर्शनास आणून देत आहोत.

**अ. पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर :**

१. श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या मूळ वास्तूला अलिकडच्या काळात झालेल्या बेशिस्त बांधकामामुळे धोका निर्माण झाला आहे. अयोग्य बांधकामे हटवून गाभाऱ्यातही पालट केल्यास मंदिर आणि श्री विठ्ठल मूर्तीचे आयुष्य वाढणार असल्याचे राज्य पुरातत्त्व विभागाचे संभाजीनगर येथील साहायक संचालक विलास वहाणे यांनी म्हटले आहे.

२. श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या छतावर घालण्यात आलेला स्लॅब आणि अनेक ठिकाणी केलेली अस्ताव्यस्त बांधकामे यांमुळे छतावरील वाढलेला अवास्तव भार मूळ मंदिरावर येत असून मंदिराच्या वास्तूस धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे आता संपूर्ण मंदिराचे 'स्ट्रक्चरल ऑडिट' करण्याचे काम पुरातत्त्व विभाग हाती घेणार आहे. यानंतर नेमके कोणते पालट करावे लागतील, याचा अहवाल पुरातत्त्व विभाग मंदिर समितीपुढे ठेवणार आहे.

३. श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराची मूळ वास्तू ११ व्या शतकातील असल्याचे मानले जात असले, तरी अनेक अभ्यासकांच्या मते ही वास्तू त्याहून पूर्वीची आहे. वास्तविक मंदिर ११ व्या शतकातील असले, तरी यानंतरच्या काळात मंदिराच्या शिखराचे काम झाले असल्याचा अंदाज पुरातत्त्व विभागाला वाटतो. यानंतरच्या काळात मात्र मूळ मंदिराच्या छतावर स्लॅब घालण्यात आल्याने मूळ मंदिरावरील भार वाढला आहे.

४. या व्यतिरिक्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीने गेल्या ३१ वर्षांत देवस्थानाच्या संपत्तीत प्रचंड घोटाळा केल्याचे उघड झाले आहे. त्यात शेकडो एकर भूमी, कोट्यवधी रुपयांचा अर्पणनिधी, लाखो रुपयांचे अलंकार, गोधन इत्यादींत अपहार झाल्याचे, तसेच देवस्थानच्या आर्थिक व्यवहारात अनियमितता असल्याचे दिसून आले आहे.

**आ. शिर्डी येथील श्री साईबाबा संस्थान :**

१. श्री साईबाबा संस्थानने भाविकांसाठी प्रसाद म्हणून लाडू बनवण्याचा ठेका 'दि यशोधरा महिला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था' या संस्थेला दिला होता. नुकतेच ही संस्था बनावट असल्याचे समोर आले आहे.

२. वरील संस्थेच्या संचालक मंडळावर ज्या संचालिका आहेत, त्यांना त्यांचे नाव संचालक म्हणून घेतल्याचेही माहित नाही. तसेच अनेक संचालकांचे पत्तेही खोटे आहेत.

३. ही संस्था वर्ष २०११ पासून कार्यरत असल्याचे सांगितले जाते; मात्र या संस्थेचे कार्यालय शोधण्याचा प्रयत्न केल्यावर तिथे बंद गाळे आढळून आले.

४. हा ठेका वर्ष २०१६ देण्यात आला आहे, अशी माहिती माहितीच्या अधिकारात उघडकीस आली आहे. याचा अर्थ गेली दोन वर्षे या ठेक्याचे पैसे नेमके कोणाला मिळत होते, याचा शोध घेण्याची आवश्यकता आहे.

५. या संदर्भात श्री साईबाबा संस्थानने, 'हा ठेका निविदा प्रक्रियेनुसार देण्यात आला आहे. या संस्थेने आम्हाला जी कागदपत्रे सादर केली, त्यानुसार आम्ही ठेका दिला. वर्तमानपत्रांमध्ये यासंबंधी वृत्त आल्यावर आम्हाला सर्व कळले. त्यामुळे संस्थेचे काम सध्या थांबवण्यात आले आहे', असे उत्तर देण्यात आले; मात्र अशी थातूर-मातूर कारणे सांगून विश्वस्त मंडळ या गंभीर प्रकारातून पळवाट काढू शकत नाही. सरकारी कामे जशी चालतात, तशीच बनावट माहितीच्या आधारे मंदिर समित्यांमध्येही कामे चालतात का, याचा तपास होणे आवश्यक आहे.

६. प्रत्येक वर्षी लक्षावधी साईभक्त मंदिराला भेट देऊन श्री साईंचे दर्शन घेतात आणि जातांना ते प्रसाद घेऊन जातात. त्या लक्षावधी साईभक्तांची ही फसवणूक आहे.

७. काही महिन्यांपूर्वीच शिर्डी येथील श्री साईबाबा संस्थानसाठी वापरण्यात येणाऱ्या तुपाच्या नमुन्यात झुरळे सापडल्याचा गंभीर प्रकार निदर्शनास आला होता.

'श्री साईबाबा संस्थान'मधील अनागोंदी कारभार एवढ्यावरच न थांबता संस्थानने वर्ष २०१५ च्या नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळ्यातील गर्दीच्या नियोजनासाठी पोलिसांच्या मागणीनुसार सुरक्षा साहित्य खरेदी केले. माहितीच्या अधिकारांतर्गत मिळालेल्या माहितीनुसार अहमदनगर पोलीस अधीक्षक कार्यालयाने दिलेल्या अंदाजित दरांपेक्षा प्रचंड चढ्या दराने हे साहित्य खरेदी केल्याचे स्पष्ट होत आहे. या खरेदी व्यवहारात चढ्या दरापोटी दिलेले ६६,५५,९९७ रुपये त्यातील भ्रष्टाचार स्पष्ट करतात. या भ्रष्टाचारातील अशी अनेक सूत्रे माहिती अधिकारात मिळालेली आहेत.

**※ तरी शासनाकडे आम्ही पुढील मागण्या करत आहोत की,**

१. श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात छतावर घालण्यात आलेला स्लॅब आणि अनेक ठिकाणी करण्यात आलेली अयोग्य बांधकामे यांसाठी कोण उत्तरदायी आहेत, त्यांची चौकशी करावी. तसेच त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी.

२. मंदिराच्या वास्तूला धोका पोहोचणार नाही, या दृष्टीने स्ट्रक्चरल ऑडिट आणि आवश्यक त्या सर्व उपाययोजना शीघ्रतेने कराव्यात.३. श्री साईचरणी भक्तांनी अर्पण केलेल्या देवनिधीचा बनावट कंपनीला देणे, हे महापाप आहे. त्यामुळे अशाप्रकारे खोट्या संस्थांना ठेका देणारे विश्वस्त आणि संबंधित अधिकारी यांची चौकशी करून प्रसादासाठी देण्यात आलेली सहस्रो रुपयांची रक्कम नेमकी कोणाला देण्यात आली, याचा तपास करवा. याचसमवेत ज्यांनी ही रक्कम हडप केली आहे, त्यांच्याकडून ती सव्याज वसूल करण्यात यावी, तसेच त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी.

४. श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, श्री साईबाबा संस्थान यांच्यासह राज्यातील सरकारीकरण केलेली सर्व मंदिरे सरकारीकरणमुक्त करून भक्तांच्या कह्यात द्यावीत.

आपला विश्वासू,

(संपर्क : )